दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०२ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## जीएसटी' मध्ये महाराष्ट्र ही देशाची राजधानी; मुख्यमंत्री

**मुंबई:** देशात सर्वात जास्त वस्तू व सेवा कर संकलन करण्यामध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये अव्वल आहे. वस्तू व सेवा कर संकलनाच्या मोबदल्यात केंद्र शासनाकडून सर्वाधिक लाभ मिळविणारे राज्यही महाराष्ट्र आहे. त्यामुळे जीएसटी व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तसेच देशामध्ये कर चोरी रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा उभारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी सांगितले.


### पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


# भ्रष्टाचाराचे मगरमच्छ : 85 हजारांचा पगार असणाऱ्या अभियंत्याकडे सापडले 100 कोटींचे साम्राज्य!

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) छाप्यात अधिकारीही चक्रावले; मुख्य अभियंता मोहन नाईकचे कारनामे उघड, 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई :** सर्वसामान्य जनता अहोरात्र कष्ट करून, घाम गाळून प्रामाणिकपणे शासनाला कर भरत असते. मार्च महिना सुरू होताच करातील प्रत्येक रुपया वाचवण्यासाठी नागरिक सनदी लेखापालाकडून (सीए) सल्ला घेतात, देशाच्या विकासासाठी आणि चांगल्या पायाभूत सुविधांसाठी आपल्या कष्टाच्या कमाईचा मोठा हिस्सा सरकारकडे जमा करतात. मात्र, जनतेच्या या रक्ताच्या पैशावर डल्ला मारणारे भ्रष्टाचाराचे भयानक मगरमच्छ शासकीय यंत्रणेत कसे ठाण मांडून बसले आहेत, याचे अत्यंत संतापजनक आणि डोळे पांढरे करणारे जिवंत उदाहरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) एका धडक कारवाईमुळे संपूर्ण राज्यासमोर आले आहे.

शासनाकडून दरमहा प्रामाणिकपणे पंच्याऐंशी हजार रुपये पगार घेणारे 'रस्ते व इमारत विभाग'चे मुख्य अभियंता मोहन नाईक यांच्या दारावर जेव्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अचानक थाप मारली, तेव्हा आतले अद्भूत आणि अवाढव्य दृश्य पाहून छाप्यासाठी गेलेले बडे अधिकारीही चक्रावून गेले. आपल्या राज्याच्या रस्त्यांचे आणि सरकारी इमारतींचे भविष्य घडवण्याची महत्त्वाची जबाबदारी असणाऱ्या या उच्चपदस्थ अधिकाऱ्याने भ्रष्टाचाराच्या माध्यमातून तब्बल शंभर कोटी रुपयांहून अधिकचे अथांग साम्राज्य उभे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पंच्याऐंशी हजार रुपये पगार असणाऱ्या या शासकीय नोकराकडे एवढी अफाट संपत्ती आली कुठून, या विचाराने सर्वसामान्य जनता आता संताप व्यक्त करत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुख्य अभियंता मोहन नाईक यांच्या विविध ठिकाणांवरील मालमत्तेवर टाकलेल्या छाप्यात वीस एकर जमीन जप्त करण्यात आली आहे, जी पाहता त्यांनी जणू संपूर्ण गावच विकत घेतल्याचा भास होतो. याशिवाय, घरातून पाच किलो शुद्ध सोने, ज्यामध्ये सोन्याची बिस्किटे आणि महागड्या दागिन्यांचा समावेश आहे, ते जप्त करण्यात आले आहे. नाईक यांच्या मालकीचे विविध शहरांत सात आलिशान फ्लॅट्स असल्याचे उघड झाले असून, एक प्रचंड मोठा ट्रायप्लेक्स व्हिला देखील आढळून आला आहे, ज्याच्या केवळ नोंदणीसाठीच (रजिस्ट्रेशन) तब्बल अडीच कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. याव्यतिरिक्त कुकटपल्ली सारख्या उच्चभ्रू भागात आणखी एक आलिशान घर आढळले असून, ज्याची किंमत पासष्ट लाख रुपये आहे. एवढेच नव्हे तर, त्यांची सत्ता आणि स्वैराचाराची लालसा भागवण्यासाठी घरात तब्बल साठ विदेशी दारूच्या मोफत बाटल्यांचा साठाही साठवून ठेवण्यात आला होता. या भ्रष्ट अधिकाऱ्याला आता न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन

-> पान 2 वर

## थोडक्यात वार्ता

### अरुणाचल प्रदेशात ढगफुटी आणि भूस्खलन; हजारो नागरिक बाधित

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील लोअर सियांग जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या ढगफुटी आणि भूस्खलनामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला असून, तब्बल १४ गावांतील ३,१०० हून अधिक नागरिक प्रभावित झाले आहेत. अचानक आलेल्या पुराचा फटका शेती आणि पशुधनालाही मोठ्या प्रमाणावर बसला असून, अनेक वाहने वाहून गेली आहेत. पूर आणि भूस्खलनामुळे तबिरिपो साकू, लोगलू, रोहे आणि कोयू यांसारख्या गावांचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे. सुमारे ५०० कुटुंबे अडकून पडली असून, गावाला जोडणारा झुलता पूल वाहून गेल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा यंत्रणा, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ग्रामस्थांना आपली घरे सोडून शेतातील तात्पुरत्या झोपड्यांमध्ये आश्रय घेण्याची वेळ आली आहे.

### शहरात मुसळधार; चिकलठाणा 36.8, तर एमजीएममध्ये 38.9 मि. मी. नोंद

**छत्रपती संभाजीनगर :** जून महिन्यात पावसाने दडी मारल्यानंतर जुलै महिन्यात देखील पावसाचे प्रमाण कमीच राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. दरम्यान बुधवारी, १ जुलै रोजी पहिल्याचे दिवशी दुपारी २.३० ते ३.३० असा तब्बल एकतास शहर परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने सर्वत्र दाणादाण उडाली. अनेक वसाहतींमध्ये पाणी शिरले, सखल भागात पाणी साचले. वाहनधारकांसहपादचाऱ्यांना पावसाने चांगलेच झोडपून काढले. शहरात दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ३६.८ मि. मी. पाऊस पडल्याची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे. एमजीएम विद्यापीठातील हवामान वेधशाळेत सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत ३८.९ मि. मी. पावसाची नोंद झाली असून, एमजीएम पडेगाव स्कूल हवामान वेधशाळेत २१.४ मि. मी. पाऊस नोंदवला गेल्याची माहिती श्रीनिवास औंधकर यांनी दिली. दरम्यान, जिल्ह्यात जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

### रायगड, पालघरमध्ये शाळांना सुट्टी जाहीर !

**मुंबई :** आज सकाळपासून मुंबई आणि आसपासच्या उपनगरांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबई व्यतिरिक्त ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्येही मुसळधार पाऊस झाला आहे. हवामान विभागाने पालघर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून, परिसरातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विले पार्ले, सांताक्रूझ आणि वांद्रे यांसह मुंबईच्या पश्चिम उपनगरातील काही भागांना मुसळधार पावसाचा तडाखा बसला. पालघर जिल्ह्यात मध्यरात्री सुरू झालेल्या पावसाने दुपारच्या सुमारास पुन्हा जोर धरला, ज्यामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले. याला प्रतिसाद म्हणून, पालघर जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. उद्या अर्थात गुरुवार २ जुलैलाही पालघर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून, जिल्हा प्रशासनाने शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.पालघर जिल्ह्याला हवामान विभागाने गुरुवारी (२ जुलै) पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. पालघर जिल्ह्यात पुढच्या २४ तासात अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# आदर्श पतसंस्था घोटाळा: ठेवीदारांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार

### 31 जुलैपर्यंत अल्टिमेटम

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** "मुलींचे लग्न अडकले आहे, आजारपणाच्या ऑपरेशनसाठी पैसे नाहीत, आयुष्यभराची पुंजी बुडाली... आता आम्ही काय करावं?" अशा अत्यंत वेदनादायी व्यथा मांडत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतील हजारो ठेवीदार आज रस्त्यावर उतरले. अनेक वर्षांपासून अडकलेली आपली हक्काची ठेव परत मिळावी. आदर्श पतसंस्थेतील अडकलेली रक्कम सर्व सामान्य ठेवीदारांना तातडीने परत मिळावी. या घोटाळ्यातील मुख्य दोषींवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. मालमत्ता जप्त करून त्यातून ठेवीदारांची देणी भागवण्याची प्रक्रिया वेगवान करावी. या मागणीसाठी माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य 'धडक मोर्चा' काढण्यात आला. या आंदोलनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी आंदोलक महिला आणि नागरिकांनी हातात थाळ्या आणि घंटा घेऊन जोरदार 'थाळी नाद' व 'घंटा नाद' केला. "आमचे कष्टाचे पैसे परत द्या!", "दोषींवर कारवाई झालीच पाहिजे!" अशा मोठमोठ्या घोषणा देत ठेवीदारांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून सोडला. यावेळी पोलीस प्रशासनाचा मोठा बंदोबस्त तैनात होता, मात्र संतप्त ठेवीदारांनी जोरदार निदर्शने करत आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनात माजी खासदारांसह एमआयएमचे आजी-माजी नगरसेवक आणि पदाधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना इम्तियाज जलील यांनी राज्य सरकार आणि प्रशासनावर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. तसेच, "येत्या ३१ जुलैपर्यंत जर शासनाने ठेवीदारांच्या पैशांबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांच्या दारात यापेक्षाही मोठे आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा थेट अल्टिमेटम त्यांनी दिला.

**मोर्च्यानंतर पत्रकारांशी आणि आंदोलनकर्त्यांशी बोलताना इम्तियाज जलील यांनी प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर बोट ठेवले. ते म्हणाले की, आदर्श पतसंस्थेत सुमारे ₹२०० कोटींचा घोटाळा झाला असून हजारो कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. असे असतानाही, गेल्या दोन वर्षांत जिल्हाधिकाऱ्यांनी या संवेदनशील विषयावर एकही आढावा बैठक घेतलेली नाही. हा ठेवीदारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. "हजारो कुटुंबांच्या आयुष्यभराच्या कष्टाची कमाई मिळेपर्यंत आमचा हा लढा थांबणार नाही. तुमच्या न्यायासाठी मी शेवटपर्यंत लढणार!"**

**— इम्तियाज जलील (माजी खासदार)**

## मुसळधार पावसानंतर महापालिकेचा अलर्ट; आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज

### महापौर व आयुक्त यांचा नियंत्रण कक्षाला दौरा





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात बुधवारी दुपारी झालेल्या मुसळधार पावसानंतर अनेक भागांत पाणी साचणे, झाडे कोसळणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याच्या घटना घडल्या. या सर्व तक्रारींवर महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन विभागाने तातडीने कारवाई करत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, पुढील काही दिवस अतिवृष्टीची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने केले आहे. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षानुसार बुधवारी शहरात ३६.०८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. विवेकानंद महाविद्यालयामागे मोठे झाड उन्मळून पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. कर्मचाऱ्यांनी तातडीने झाड हटवून वाहतूक पूर्ववत केली.

याशिवाय विजयनगर येथील जय दुर्गा सोसायटीच्या तळमजल्यात, न्यू हनुमाननगरमधील अष्टविनायक मंदिर परिसरात, उल्कानगरीतील अगस्ती होमसमोरील रस्त्यावर तसेच सिडको एन-३ येथील कम्युनिटी हॉल परिसरातील रुग्णालयाच्या तळमजल्यात पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. अग्निशमन विभागाने घटनास्थळी पोहोचून पाण्याचा निचरा करत नागरिकांना दिलासा दिला. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी महापौर समीर राजूरकर आणि आयुक्त अमोल येडगे यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपआयुक्त तथा आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख अंकुश पांढरे आणि कक्ष प्रमुख स्वप्नील सरदार उपस्थित होते. शहरातील प्रत्येक घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने मदत पोहोचविण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महापालिकेने नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती नियंत्रण कक्षाचे ०२४०-२६१७१६५ / २६१७१६६, अग्निशमन नियंत्रण कक्षाचे ०२४०-२३३४००० तसेच व्हॉट्सअॅप क्रमांक ९८२३२७०७८२ जारी केले आहेत. पूर, पाणी साचणे, झाड कोसळणे किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी या क्रमांकांवर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 14 कोटींच्या मंजुरीने जि.प.च्या नव्या प्रशासकीय इमारतीला गती; सर्व विभाग एकाच छताखाली आणण्याचा मार्ग मोकळा





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत तब्बल १४ कोटी रुपयांच्या महत्त्वाच्या निर्णयाने नव्या प्रशासकीय इमारतीचे काम पूर्णत्वाकडे नेण्याचा मार्ग मोकळा झाला. फर्निचर व अनुषंगिक कामांसाठी उपकर निधीतून १४ कोटी रुपयांना मंजुरी देण्यात आली, तर इमारतीला अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी नवीन सबस्टेशन उभारणीसाठी जिल्हा परिषदेच्या मालकीची सहा गुंठे जागाही देण्यात आली. या निर्णयांमुळे अनेक वर्षांपासून विखुरलेले जिल्हा परिषदेचे सर्व विभाग एकाच छताखाली आणण्याच्या प्रक्रियेला वेग मिळणार आहे. याच सभेत विकासकामे, आरोग्य, सामाजिक न्याय, ग्रामविकास आणि अर्थसंकल्पाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवरही निर्णय घेण्यात आले.

प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचर आणि अनुषंगिक कामांसाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्याच्या प्रस्तावावर सभेत जोरदार चर्चा झाली. सदस्य विद्या गायकवाड, राधाकिशन पठाडे आणि देवीदास पालोदकर यांनी या खर्चावर आक्षेप घेतला. मात्र, पंकज ठोंबरे, संजय निकम, मनोज गायके, केतन काजे, रतन बत्तीसे आणि प्रतीक्षा कापसे यांनी विविध विभाग वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगत हा खर्च आवश्यक असल्याची भूमिका मांडली. अखेर बहुमताने प्रस्ताव मंजूर झाला.

-> पान 2 वर

## NHMच्या 15,010 कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा

### छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 277 कर्मचाऱ्यांना लाभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत गेली अनेक वर्षे कंत्राटी तत्त्वावर सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या राज्यातील १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनासाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा शासन निर्णय सोमवारी जारी करण्यात आला. या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २७७ कर्मचाऱ्यांचाही नियमित वेतनश्रेणीकडे जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयासाठी वार्षिक १,१५३.६० कोटी रुपयांच्या खर्चालाही शासनाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर हा निर्णय झाला आहे.

शासन निर्णयानुसार, २५ जून २०२६ पर्यंत तांत्रिक खंड वगळता सलग १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. पदांची समकक्षता निश्चित करताना कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, शैक्षणिक पात्रता, सेवा नियम, विद्यमान मानधन आणि सातव्या वेतन आयोगानुसार लागू असलेली वेतनश्रेणी विचारात घेतली जाणार आहे.

नियुक्तीनंतर कर्मचाऱ्यांना समकक्ष पदाच्या वेतनश्रेणीतील किमान मूलभूत

-> पान 2 वर

## ग्रीव्हज कॉटन कंपनीच्या दूषित पाण्यामुळे मिसरवाडीचा मुख्य रस्ता जलमय; संतप्त नागरिकांचा प्रशासनाला गुन्हा दाखल करण्याचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** एमआयडीसी चिकलठाणा येथील ग्रीव्हज कॉटन लिमिटेड या कंपनीमधून बाहेर पडणारे रासायनिक व दूषित पाणी थेट रस्त्यावर सोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने हे दूषित पाणी मिसरवाडी येथील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर साचले असून, या संपूर्ण परिसराला तलावाचे स्वरूप आले आहे. वारंवार तक्रारी करूनही कंपनी व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासन या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत, भाजपचे शक्ती केंद्रप्रमुख कचरू उत्तम कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. तसेच प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे. मिसरवाडीतील नागरिकांना येण्या-जाण्यासाठी हा एकच मुख्य रस्ता आहे.

-> पान 2 वर



**हा मुख्य रस्ता मिसरवाडीतील लोकांना एकमेव रस्ता आहे या पाण्यामुळे नागरिकांना येणे जाण्यास खूप त्रास होत आहे वाहने या पाण्यातून जाऊ शकत नाही शाळेतील मुलांना येण्याचा त्रास होत आहे वृद्धांना महिलांना खूप त्रास होत आहे या ग्रीव्हज कंपनीच्या व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात यावा व योग्य ते काम करावे हे पाणी रस्त्यावर साठणार नाही याची कंपनीच्या व्यवस्थापकाने काळजी घ्यावी अन्यथा आम्ही सर्व मिसरवाडीतील नागरिक कंपनीला टाळे ठोकल्याशिवाय राहणार नाही.**

**- कचरू कांबळे**
**राज्य कार्याध्यक्ष लहू प्रहार**

## "खरं की काय"





# शिक्षक विलास पाटील सेवानिवृत्त; वाढदिवस आणि निरोप समारंभाचा अनोखा त्रिवेणी संगम!

### ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले, तिथेच 31 वर्षे ज्ञानदान करून विलास पाटील सरांनी घेतला भावपूर्ण निरोप; स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये सपत्नीक सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी



**जालना :** येथील नुतन वसाहत भागातील स्वामी विवेकानंद हायस्कूलचे वरिष्ठ शिक्षक विलास पाटील हे नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त शाळेच्या वतीने एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या दिवशी विलास पाटील सर सेवानिवृत्त झाले, नेमका त्याच दिवशी त्यांचा वाढदिवस देखील होता. त्यामुळे शाळेत सेवानिवृत्ती सोहळ्यासोबतच त्यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या दुहेरी योगदानामुळे संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

विलास पाटील सरांचा स्वामी विवेकानंद हायस्कूलशी असलेला ऋणानुबंध अत्यंत अनोखा आणि जिव्हाळ्याचा आहे. ते याच शाळेचे माजी विद्यार्थी होते आणि त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण याच संस्थेत पूर्ण केले होते. त्यानंतर आपले उच्च शिक्षण पूर्ण करून ते आपल्या मातृसंस्थेत म्हणजेच स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्येच शिक्षक म्हणून रुजू झाले. ज्या शाळेत आपण स्वतः अ आ इ ई शिकलो, त्याच शाळेत शिक्षक म्हणून तब्बल ३१ वर्षे अविरत ज्ञानदान करण्याचे भाग्य त्यांना लाभले. आपली ३१ वर्षांची प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवा पूर्ण करून ते सन्मानाने सेवामुक्त झाले आहेत. एकाच संस्थेत विद्यार्थी आणि नंतर वरिष्ठ शिक्षक म्हणून घालवलेला हा प्रवास सर्वच शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असा आहे.

या कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी स्वामी विवेकानंद हायस्कूलचे सचिव प्रधान सर आणि मुख्याध्यापक राहुल सोनवणे यांच्या हस्ते विलास पाटील सरांचा त्यांच्या पत्नीसह सपत्नीक शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. आपल्या लाडक्या सरांना निरोप देताना शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी अत्यंत भावूक झाले होते. सरांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर त्यांच्यावर उत्तम संस्कार करत अनेक पिढ्या घडवल्या, अशा आठवणी याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या कौटुंबिक आणि शासकीय निरोप समारंभाच्या वेळी विलास पाटील सरांचा संपूर्ण परिवार देखील त्यांच्यासोबत उपस्थित होता. उपस्थितांनी पाटील सरांना त्यांच्या सेवावृत्तीबद्दल धन्यवाद दिले आणि त्यांच्या भावी निरोगी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय

## पीएफ अन् ग्रॅज्युटीवरील ऐतिहासिक निकाल!

एखादी मोठी कंपनी जेव्हा आर्थिक संकटात सापडते, दिवाळखोरीत निघते किंवा ती पूर्णपणे बंद पडण्याच्या (परिसमापन) उंबरठ्यावर असते, तेव्हा त्या कंपनीसाठी आपले रक्त आणि घाम गाळणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधारात सापडते. बँका आणि मोठे वित्तीय कर्जदार स्वतःचे पैसे वसूल करण्यासाठी आधी धावपळ करतात, तर वर्षानुवर्षे कंपनीला जिवंत ठेवणाऱ्या कामगारांना मात्र वाऱ्यावर सोडले जाते. अशा अत्यंत बिकट आणि हताश परिस्थितीत अडकलेल्या देशभरातील लाखो कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय कंपनी कायदा अपीलीय न्यायाधीकरणाने (एनसीएलएटी) एका ऐतिहासिक आणि अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णयाद्वारे फार मोठा कायदेशीर दिलासा दिला आहे. एखादी कंपनी दिवाळखोरीत किंवा परिसमापनात गेली, तरीही त्या कंपनीतील कर्मचाऱ्यांना त्यांचा संपूर्ण भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि ग्रॅज्युटी मिळणे कायदेशीररित्या बंधनकारकच आहे, मग त्यासाठी संबंधित नियोक्त्याने आधीपासून स्वतंत्र फंड तयार केलेला असो वा नसो, असा स्पष्ट आणि कडक संदेश न्यायाधीकरणाने दिला आहे. हा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय जेट एअरवेजच्या माजी कर्मचाऱ्यांशी संबंधित गाजलेल्या प्रकरणात देण्यात आला आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) आणि इतर मोठ्या वित्तीय कर्जदारांनी कर्मचाऱ्यांच्या या हक्काला विरोध करत न्यायाधीकरणाकडे अपील दाखल केले होते. मात्र, न्यायाधीकरणाने कर्जदारांचा हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायाधीकरणाने आपल्या निर्णयात अतिशय स्पष्ट शब्दांत नमूद केले की, पीएफ आणि ग्रॅज्युटीसारखे वैधानिक देणे (स्टॅच्युटरी ड्यूज) हे कंपनीच्या लिक्विडेशन मालमत्तेचा (परिसमापन मालमत्ता) भाग मानले जाऊ शकत नाही. बँका किंवा इतर कर्जदार स्वतःचे कर्ज वसूल करण्यासाठी या पैशांवर अजिबात हक्क सांगू शकत नाहीत. हा पैसा पूर्णपणे कर्मचाऱ्यांच्या मालकीचा असून, कंपनी बंद होताना तो कर्मचाऱ्यांना इतर कोणत्याही देण्यापेक्षा सर्वोच्च प्राधान्य देऊन आधी दिलाच पाहिजे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर नजर टाकल्यास, जेट एअरवेजचा रिझोल्यूशन प्लॅन पूर्णपणे अपयशी ठरल्यानंतर कंपनीला लिक्विडेशनमध्ये म्हणजेच सर्व मालमत्ता विकून देणी फेडण्याच्या प्रक्रियेत पाठवण्यात आले होते. या प्रक्रियेदरम्यान जेट एअरवेजच्या कर्मचाऱ्यांनी न्यायालयात असा दावा केला होता की, त्यांचे पीएफ आणि ग्रॅच्युइटीचे देणे इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी कोड (आयबीसी) अंतर्गत पूर्णपणे सुरक्षित श्रेणीत येते आणि ते परिसमापन मालमत्तेत समाविष्ट केले जाऊ नये. यावर बँका आणि इतर मोठ्या कर्जदारांचे असे म्हणणे होते की, ही सुरक्षा फक्त तेव्हाच लागू होऊ शकते जेव्हा लिक्विडेशन सुरू होण्याच्या प्रत्यक्ष तारखेला कंपनीकडे स्वतंत्र पीएफ किंवा ग्रॅच्युइटी फंड आधीपासून अस्तित्वात असेल. जर कंपनीने असा स्वतंत्र फंड ठेवलाच नसेल, तर कर्मचाऱ्यांना हा पैसा आधी देता येणार नाही. मात्र, न्यायाधीकरणाने हा अत्यंत स्वार्थी युक्तिवाद थेट फेटाळून लावत कर्मचाऱ्यांच्या बाजूने न्यायनिवाडा केला. न्यायाधीकरणाने आपल्या आदेशात पुढे स्पष्ट केले की, लिक्विडेटर हा कर्मचाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युटीचे संपूर्ण देणे देण्यासाठी पूर्णपणे जबाबदार आहे, जसे की एम्प्लॉईज प्राव्हिडेन्ट फंडस अँड मिस्लेनिअस प्रोव्हिजन ॲक्ट आणि पेमेंट ऑफ ग्रॅज्युटी ॲक्ट नुसार कायदेशीररित्या ठरवलेले आहे. कंपनीने स्वतंत्र फंड न ठेवणे ही कंपनीची चूक आहे, त्याची शिक्षा कर्मचाऱ्यांना मिळू शकत नाही. दरम्यान, न्यायाधीकरणाने वेतन थकबाकीबाबत कर्मचाऱ्यांच्या मागणीचा काही भाग स्वीकारण्यास नकार दिला असून, स्पष्ट केले आहे की जानेवारी ते मार्च या कालावधीतील वेतनाचे जुने दावे आयबीसीच्या वॉटरफॉल मेकॅनिझम अंतर्गतच नियमानुसार निकाली काढले जातील. हा निर्णय देशातील दिवाळखोरी प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचे कायदेशीर हक्क अधिक मजबूत करणारा आणि कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावणारा ठरेल.

## एकही पात्र मतदार वंचित राहू नये; जिल्हाधिकारी नतिशा माथुर यांचे निर्देश



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरु असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी नतिशा माथुर यांनी 96 -परभणी विधानसभा मतदारसंघातील परभणी शहरातील गांधी विद्यालय, खोली क्र. १ येथील मतदान केंद्रास तसेच ग्रामीण भागातील कारेगाव येथील मतदान केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी मतदान केंद्रांवर सुरू असलेली मतदार पडताळणी, घरभेटी, आवश्यक कागदपत्रांची तपासणी, प्रगणक प्रपत्र भरण्याची प्रक्रिया तसेच विशेष सखोल पुनरीक्षणाची संपूर्ण कार्यपद्धती याची सविस्तर माहिती घेतली. त्यांनी संबंधित बीलओ व बीएलओ पर्यवेक्षकांशी संवाद साधून कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी मतदान केंद्राच्या कार्यक्षेत्रातील प्रत्यक्ष मतदारांच्या घरी भेट देऊन विशेष सखोल पुनरीक्षण अंतर्गत प्रगणक प्रपत्र भरण्याच्या प्रक्रियेची पाहणी केली. त्यांनी मतदारांशी संवाद साधत आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करून प्रगणक प्रपत्र प्रत्यक्ष भरून घेतला. तसेच प्रत्येक पात्र मतदाराचा प्रगणक प्रपत्र अचूक, संपूर्ण व वेळेत भरून घेण्यात यावा, आवश्यक कागदपत्रांची योग्य पडताळणी करण्यात यावी तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना संबंधित बीलओ व बीएलओ पर्यवेक्षकांना दिल्या. प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून त्यांची माहिती अचूक व अद्ययावत करण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच आवश्यक कागदपत्रांची काटेकोर पडताळणी करून भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व प्रक्रिया पार पाडण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम प्रभावी, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक प्रगणक प्रपत्र अचूक व संपूर्ण भरून घेणे, प्रत्येक अर्जाची नियमानुसार तपासणी करून कार्यवाही करणे, कोणताही पात्र मतदार वंचित राहू न देणे तसेच मतदार यादी अधिकाधिक अचूक व त्रुटीरहित करण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. दोन्ही मतदान केंद्रांवरील प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी करून जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ते मार्गदर्शन केले. यावेळी नितीन नार्वेकर, अतिरिक्त जिल्हा निवडणुक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त परभणी, मतदार नोंदणी अधिकारी उदयसिंह भोसले, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. संदीप राजपुरे व निवडणूक विभागातील अधिकारी/ कर्मचारी सुनिल कांबळे नायब तहसीलदार निवडणुक परभणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संदीप पवार, दिलीप भुसारे कर्मचारी उपस्थित होते.

## घनघनमाला

आपल्या तृषार्त भूमीला कायम मेघांची ओढ लागलेली असते. सूर्य दर्शन नाही असा लांबलचक काळ आपल्याकडे नसतो. तिन्ही मौसम साही ऋतु आपल्या आपल्या वेळेला येऊन भारतावर कृपेचा वर्षाव करत असतात. वर्षभर सततचा पिरपिर पाऊस---"आता तरी जा बाबा—" असा नकोसा नाराज सूर लावू देत नाहीत. उन्हाळ्याने धरणी तापून माती मोकळी मोकळी होत असताना चिमण्या आणि पक्ष्यांनी मातीत पंख फरफर करत मृत्तिका स्नान सुरू केलं की; कावळ्यांनी घरटी बांधायला सुरवात केली की; गुलमोहराने आपली लालचुटुक छत्री उघडली की; अमलतासाने आपल्या कानात पुष्कराजाची पिवळी कर्णफुले माळली की; कडुनिंब आणि आंब्यावर पुन्हा लाल चमकदार पानं डोकावू लागली की; आकाशात अगस्तीच्या ताऱ्याचा अस्त झाला की; पावशाने 'पेरते व्हा' ची साद घातली की -----------!!!

आकाशातून ढगांचे गोळे आनंदानी डोकावून पाहू लागतात. दही घुसळायला लागल्यावर थोडे थोडे लोण्याचे अस्तित्व जाणवावे तसे निळ्याशार आकाशात वाऱ्यानी घुसळायला सुरवात केली की ढगांचे हलके हलके उमटणारे फरकाटे हळुहळु लोण्याच्या गोळ्यांसारख्या ढगांमधे एकत्रित व्हायला लागतात. आकाशात पांढरे ढग्गु गोळे दाट होत काळ्या रंगाकडे झुकायला लागतात. वाऱ्याचं घुसळणं सुरूच असतं आणि बघता बघता आकाशात ढगांचं दाट लोणी तयार होतं. काळ्या काळ्या ढगांच्या एकावर एक थप्प्या साठायला सुरवात होते. विविध आकाराचे ढग सकाळ संध्याकाळ छानशी चित्रनगरी तयार करतात. त्यात गणपती, शंकर, मगर, देऊळ अशी कुठली कुठली चित्र तयार झाली आहेत हे पहायचा सर्वांनाच नाद लागतो.

कालिदासालाही एका भल्या मोठ्या ढगाला पाहून त्यात डोंगराला धडक देणारा भला मोठा गजराज दिसायला लागतो. ह्या प्रवासी ढगाला तो आपल्या प्रियेच्या घराचा (अगदी आज 'लोकेशन' कळविल्या प्रमाणे) कुठून कसा कसा जा हा सविस्तर मार्ग सांगतो.

पहिला पाऊस येतो तोही येतांना साग्रसंगित त्याच्या येण्याची वर्दी देत, नगारे वाजवतच येतो. बिजलीचे आसूड ढगांतून ओढत येतो. अशा ह्या पहिल्या पावसाची वाट आपण सारेच जण पहात असतो. प्राणी, पक्षी, माणसं तर वाट पहातच असतात पण झाडं आणि चुपचाप झोपलेल्या बियाही ह्या पावसाची वाट बघत असतात.

ह्या झाडांमधेच दक्षिण भारतात असलेलं एक खास झाड आहे. त्याचं नाव अंकोल. जानेवारी फेब्रुवारीतच त्याला फुलं येऊन छोटी गोडसर फळं जमिनीवर विखुरतात. मुंग्या ही गोड फळं खाऊन टाकतात आणि आतल्या बिया जमिनीवर पसरतात. ह्या चिमुकल्या बिया पावसाची वाट बघत असतात. त्यांना जणु पावसाच्या थेंबांची पहिली टपटप ऐकू येते. बिजलीची चमकदार रेघ त्यांच्याही मनात एक ओढ निर्माण करते. आणि एका रात्रीत रानोमाळ इतस्ततः पडलेल्या सगळ्या बिया मूळ झाडाच्या बुंध्याला जाऊन चिकटतात. झाडाच्या मुळांपाशीच रुजतात, उगवतात. झाडाला जर पार बांधलेला असेल तर पाराला जाऊन चिकटतात. कशा ते अजून कोणालाच कळलं नाही. असं म्हणतात की, ह्या बिया झाडाला कशा चिकटतात हे पहायला आद्य शंकराचार्य रात्रभर जागे राहिले पण त्यांनाही ही जादू लक्षात आली नाही. बिन पायाच्या बिया कुठल्या ओढीने आपल्या जन्मदात्या झाडाला भेटायला जातात न कळे. अंकोलाच्या बियांची झाडाकडे धाव घेणारी तीव्र ओढ पाहून आद्य शंकराचार्यांना वाटलं भक्ती असावी ती अशी! (शिवानंदलहरी)



येती पुष्प फळे वसंतऋतुते अंकोलवृक्षास त्या
बीजे मुक्तची वाळुनी पसरती मातीत त्या खालच्या।।

जाता ग्रीष्म सरून वावटळ ती येतेच जेंव्हा नवी
संगे घेउन पावसास चमके विद्युलता ती नभी ।।

काळोख्या रजनीस ती विखुरली बीजेच मातीतली
घेती आश्रय घट्टची बिलगुनी वृक्षास फांद्यांसही।।

ना सोडी तरुसी तिथेच रुजती अंकोल वृक्षापदी
तैसे चित्त सदैव पाउलि तुझ्या राहो भवानीपती ।।

त्यासी अन्य गती नसो तुजविणा गंगाधरा कोणती
माझी भक्ति रुजो तुझ्याच चरणी ही प्रार्थना एकची।।

कोरड्या मातीवर पाण्याचे थेंब पडले की सुगंध दरवळतो आणि त्याचसोबत मातीच्या उबदार कुशीत गाढ झोपलेल्या चिमुकल्या बियांना नवीन जीवनाची सुरवात करण्याचा संदेश मिळतो. पावसाच्या थेंबांमुळे विशेषतः एकदल धान्याचे बियाणे 30 ते 40 टक्के अधिक वेगाने अंकुरित होते.

अमेरिकेतील मॅसेच्युसेट्स इंस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनानुसार, प्रत्येक बी ला जमिनीची खालची दिशा आणि आकाशाची वरची दिशा समजेल असा स्टॅटोलिथ नावाचा दाट,जड अशा स्टार्चनी बनलेला पिटुकला भाग/अवयव प्रत्येक पेशीच्या बुडापाशी असतो. जेव्हा पावसाचे थेंब जमिनीवर अथवा पाण्यात पडतात तेव्हा टपटप होणारा आवाज ध्वनीलहरी आणि हळुवार दबावाच्या लहरी निर्माण करतात. त्याने जवळपासच्या बियांमधले स्टॅटोलिथचे कण जागृत होतात, जरा मोकळे होतात. त्यांना वरची दिशा कळते आणि वरच्या दिशेने अंकुर वेगाने वाढायला सुरवात होते. (MIT News)

पावसाच्या थेंबांमुळे तयार होणाऱ्या तरंगलहरी बियांना जागवतात आणि त्यांच्या अकुरण्याची वेळ आल्याची त्यांना आठवण करून देतात.

पहिल्या पावसात चिंब भिजायची तीव्र इच्छा, वर्षास्नान आणि पावसात न्हाऊन चिंब झालेली; पावसाने समृद्ध झालेली पृथ्वीरूपी लक्ष्मी ह्या अत्यानंद देणाऱ्या भारतीय कल्पना मला फार वेगळ्या आणि अनमोल वाटतात.

पावसात भिजून चिंब चिंब होणाऱ्या वसुंधरेला पाहून; तिच्यावर चारी दिशांनी जलवर्षाव करणारे हत्तीसारखे प्रचंड ढग पाहून; पावसामुळे तृप्त, सुजला, सुफला झालेली वसुंधरा पाहून; ह्या सस्यश्यामला वसुंधरेच्या रूपातील गजांतलक्ष्मीची मूर्ती साकार करत कनकधारा स्तोत्रात श्री आद्य शंकराचार्य म्हणतात,

हे माय! ऐश्वर्य आणि औदार्य हे दोन्ही गुण हातात हात घालून अत्यंत नम्र भावाने जणु तुझ्यापाशी कायमचे राहतात. माहेर सासर दोन्हीकडून तू सम्पन्न आहेस. अमृताच्या सागराची तू पुत्री आहेस. तर तिन्ही लोकांचे, चौदा भुवनांचे जे नायक श्रीविष्णू त्यांची तू धर्मपत्नी आहेस. ह्या सर्व विश्वाची, जगाची तू माय आहेस. तुझ्या ऐश्वर्याला काही कमीच नाही.

माते चारी दिशात जणु चार मदमस्त हत्ती त्यांच्या सोंडेत सुवर्णकलश घेऊन उभे आहेत. त्यांचे कलश अत्यंत पवित्र अशा स्वर्गीय जलाने भरलेले आहेत. वारंवार ते तुझ्यावर त्या विमल जलाचा वर्षाव करत आहेत. तुला अभिषेक करत आहेत. त्या स्फटिकासमान पारदर्शक जलाने तू अगदी चिंब चिंब झाली आहेस. माय ह्या जलाने कदाचित तू बाह्यांगाने ओली झाली असशील ही; परंतु तुझ्या हृदयात दयेचा पाझर स्वभावतःच आहे. सर्वांचं दारिद्र्य, दुःख, भय दूर करून सर्वांवर कृपा करणारं तुझं मन अत्यंत दयार्द्र आहे. तुला 'सर्वोपकारकरणाय सदार्द्रचित्ता' म्हणतात ते उगीच का? तुझ्यासारखी अत्यंत कनवाळु, सर्वांवर उपकार करण्यासाठी सदैव कटिबद्ध अशी कोणी व्यक्ती मिळू शकेल का? श्रीसूक्तामधेही लक्ष्मीचे 'आर्द्रा' हे विशेषण आले आहे. पाऊस-पाण्याने छान भिजलेल्या जमिनीलाही लक्ष्मी म्हटले जाते ते ह्यासाठीच. अशी जमिन धान्याच्या रूपात जणू लक्ष्मीच देत असते. अन्नपूर्णास्तोत्रातील अन्नपूर्णा दुसरी तिसरी कोणी नसून उर्वी म्हणजे ही वसुंधराच आहे.

हे माय म्हणूनच सुजला, सुफला सस्यश्यामला अशा ऐश्वर्यसम्पन्न आणि औदार्यपूर्ण असलेल्या तुला मी शरण आलो आहे . माझं मनोरथ तूच पूर्ण करू शकशील. माय तुला पुन्हा पुन्हा वंदन!

चारी दिशात सजले गज स्वागतासी
गंगा सलीलयुत हेमघटा धरोनी
वर्षाव ते तुजवरी करिती जलाचा
आहे अती विमल जे सुखवी तनूला॥17.1

तू चिंब गे सुखद त्या जल-वृष्टीने ची
पुत्रीच त्या जलधिची सुखसागराची
आहेत थोर उपकार तुझेच आई
विश्वावरी सकल या गणती न त्यासी।।17.2

सत्ता अबाधित जयाचिच तीन लोकी
त्या लोकनाथ हरिची असशीच पत्नी
प्राणप्रियाच हरिची जननी जगाची
माते करी नमन मी तव पादपद्मी ।।17.3

**- अरुंधती प्रवीण दीक्षित**

## भोकर पॅटर्न : 62 दिवसांचा नरसापूर निकाल ऐतिहासिक, तर 42 दिवसांचा भोकरचा निकाल ठरला अद्वितीय!

### महाराष्ट्राच्या न्यायालयीन इतिहासात वेगाने न्याय देण्याचा नवा वस्तुपाठ

पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा निकाल अवघ्या ६२ दिवसांत लागल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले जात आहे. नराधम आरोपी भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावून पीडितेला न्याय दिला. समाजामध्ये अशा क्रूर प्रवृत्तींना जरब बसवण्यासाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, नरसापूरचा हा ६२ दिवसांचा खटला जिथे राज्यातील सर्वात वेगवान खटल्यांपैकी एक ठरला आहे, तिथेच या निमित्ताने महाराष्ट्रातील आणखी एका थक्क करणाऱ्या निकालाची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे, तो म्हणजे भोकर जिल्हा न्यायालयाचा 'सुपर फास्ट' निकाल!



नांदेड जिल्ह्यातील भोकर जिल्हा न्यायालयाने यापूर्वी पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत चाललेल्या एका अत्यंत गंभीर गुन्ह्याचा निकाल अवघ्या ४२ दिवसांच्या विक्रमी वेळेत लावून राज्याच्या कायदेशीर इतिहासात एक नवा विक्रम प्रस्थापित केला होता. 'स्पेशल पोक्सो केस नंबर ०६/२०२१' अंतर्गत चाललेल्या त्या खटल्यात सरकार विरुद्ध बाबुराव उकंडु संगेराव यांच्यात भारतीय दंडविधान संहिता (भा.द.वि.) कलम ३०२, ३६३, ३७६, ३७७ आणि पोक्सो कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल झाला होता. १० फेब्रुवारी २०२१ रोजी दाखल झालेल्या त्या खटल्याची संपूर्ण सुनावणी पूर्ण करून अवघ्या ४२ दिवसांत, म्हणजेच २२ मार्च २०२१ रोजी भोकरचे जिल्हा न्यायाधीश एम. एस. शेख यांनी नराधम आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावून इतिहास रचला होता. त्या ऐतिहासिक खटल्यात सरकारी वकील म्हणून ॲड. रमेश राजूरकर यांनी अत्यंत भक्कमपणे काम पाहिले होते.

नरसापूर आणि भोकर या दोन्ही प्रकरणांची तुलना केल्यास हे स्पष्ट होते की, जेव्हा पोलीस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था अत्यंत तत्परतेने काम करते, तेव्हा पीडितांना मिळणारा न्याय लांबणीवर पडत नाही. नरसापूर प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी केवळ १५ दिवसांत १,२०० पानांचे आरोपपत्र दाखल करून कौतुकास्पद कामगिरी केली, ज्यामुळे ६२ दिवसांत निकाल शक्य झाला. परंतु, कायदेशीर प्रक्रियेचा वेग आणि पुराव्यांची अचूक मांडणी या बाबतीत भोकर न्यायालयाने लावलेला ४२ दिवसांचा निकाल हा आजही संपूर्ण महाराष्ट्रात 'सुपर फास्ट एक्सप्रेस' पॅटर्न म्हणून ओळखला जातो. सामान्यतः कोर्टाच्या वाऱ्या आणि न्यायासाठी लागणारी वर्षानुवर्षांची प्रतीक्षा यामुळे नागरिकांमध्ये जी निराशा असते, ती अशा गतिमान निकालांमुळे दूर होण्यास मदत होते. नरसापूरच्या निकालाने राज्यात निर्माण झालेला संताप शांत केला असला, तरी कमीत कमी वेळेत खटला निकाली काढण्याचा भोकर न्यायालयाचा ४२ दिवसांचा विक्रम हा आजही अद्वितीय आणि मार्गदर्शक ठरला आहे. जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या खटल्यांचा विषय निघेल, तेव्हा तेव्हा भोकरचा ४२ दिवसांचा आणि नरसापूरचा ६२ दिवसांचा निकाल हा गुन्हेगारांचे धाबे दणाणणारा सर्वात मोठा मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही.

## भ्रष्टाचाराचे मगरमच्छ : 85 हजारांचा पगार असणाऱ्या अभियंत्याकडे सापडले 100 कोटींचे

पान 1 वरून ->

कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास अत्यंत वेगाने सुरू आहे.

दरवर्षी पावसाळा सुरू होताच कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेले रस्ते का वाहून जातात, पूल वापरात येण्यापूर्वीच का कोसळतात, या सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नाचे मुख्य उत्तर आता या कारवाईमुळे संपूर्ण जगासमोर आले आहे. रस्ते आणि पुलांच्या निर्मितीसाठी शासनाकडून जो निधी मंजूर केला जातो, त्या निधीमधील अर्धा हिस्सा जेव्हा अशा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या आलिशान व्हिलासाठीच्या विटा, अपार्टमेंटमधील महागडा संगमरमर आणि त्यांच्या वैयक्तिक तिजोऱ्यांमधील सोने खरेदी करण्यासाठी खर्च होतो, तेव्हा रस्त्यांवर डांबराऐवजी फक्त धूळ आणि चिखलच शिल्लक राहतो, हे उघड सत्य आहे. भ्रष्टाचाराच्या या भयंकर वाळवीमुळेच राज्यातील रस्ते आणि सार्वजनिक इमारती कमकुवत होऊन कोसळतात. सर्वसामान्य कष्टकरी नागरिक, व्यावसायिक आपल्या गाड्या खड्ड्यांमध्ये घालतात, शारीरिक आजार सोसतात आणि अनेकदा भीषण अपघातांमध्ये आपल्या प्रियजनांना गमावतात; आणि दुसरीकडे हे भ्रष्ट अधिकारी जनतेच्या कष्टाच्या पैशाने घेतलेल्या ट्रायप्लेक्स व्हिलामधील सोफ्यांवर बसून विदेशी दारूचे घोट घेत ऐषोआरामात जगत असतात.

सकाळी अलार्म वाजण्यापूर्वी उठून अहोरात्र कष्ट करणारा वर्ग आणि केवळ भाकरी-मिठावर जगूनही देशाप्रती प्रामाणिक राहून कर भरणारा सामान्य नागरिक आज विचार करत आहे की, त्यांचा कर देशाच्या विकासासाठी वापरला जातो की या मगरींच्या कल्याणासाठी? ही केवळ एका मोहन नाईकची कहाणी नाही, तर शासकीय व्यवस्थेच्या दालनांमध्ये वाळवीप्रमाणे जनतेचा पैसा पोखरणारे अगणित नाईक आजही दबा धरून बसले आहेत. जोपर्यंत अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची संपूर्ण काळी मालमत्ता शासनाकडून जप्त केली जात नाही, तिचा जाहीर लिलाव करून तो पैसा लोककल्याणासाठी वापरला जात नाही आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी एक कडक उदाहरण ठरेल अशी ऐतिहासिक शिक्षा त्यांना दिली जात नाही, तोपर्यंत देशातील पायाभूत सुविधांची अवस्था बदलणार नाही.

## ग्रीव्हज कॉटन कंपनीच्या दूषित पाण्यामुळे मिसरवाडीचा...

पान 1 वरून ->

मात्र, ग्रीव्हज कॉटन कंपनीच्या पाण्याने हा रस्ता पूर्णपणे व्यापल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. रस्त्यावरून जाताना अनेक नागरिकांच्या दुचाकी व इतर वाहने या दूषित पाण्यात बंद पडत आहेत. या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे शाळेत जाणाऱ्या लहान मुलांचा रस्ताही बंद झाला असून, त्यांना घरातच अडकून पडावे लागत आहे. महिला, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना या पाण्यातून वाट काढताना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे..या रासायनिक व दूषित पाण्यामुळे संपूर्ण मिसरवाडी परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. डेंग्यू, मलेरिया यांसारखे संसर्गजन्य आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वीही अनेकवेळा या समस्येबाबत प्रशासनाकडे दाद मागण्यात आली होती, परंतु अद्याप कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. "एकीकडे कंपनीच्या बेजबाबदारपणामुळे नागरिक आणि मुलांचे हाल होत आहेत, तर दुसरीकडे प्रशासन ढिम्म बसले आहे," असा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे.

त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात स्वतः तात्काळ लक्ष घालून संबंधित ग्रीव्हज कॉटन कंपनीला रस्त्यावर पाणी सोडण्यापासून रोखावे, अशी मागणी कचरू कांबळे यांनी निवेदनात केली आहे. तसेच, प्रशासनाने या समस्येची तात्काळ दखल घेऊन ग्रीव्हज कॉटन कंपनीच्या व्यवस्थापनावर थेट गुन्हा दाखल करून कडक कायदेशीर कारवाई करावी, असा स्पष्ट इशारा मिसरवाडीतील समस्त नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

## 14 कोटींच्या मंजुरीने जि.प.च्या नव्या प्रशासकीय इमारतीला

पान 1 वरून ->

नव्या प्रशासकीय इमारतीसाठी स्वतंत्र वीजपुरवठा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने नवीन सबस्टेशन उभारण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मालकीची ६५० चौरस मीटर (सुमारे सहा गुंठे) जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.

जिल्हा परिषदेच्या मालकीचे भूखंड बीओटी तत्त्वावर विकसित करण्यासाठी वास्तुविशारद आणि सल्लागार नेमण्यास मंजुरी देण्यात आली. वैजापूर येथील जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण होत असल्याचे निदर्शनास आणून देत त्या ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारून उत्पन्न वाढविण्याची मागणी सदस्य संजय निकम यांनी केली. तर नवीन वकिलांचे पॅनल तयार करण्याची मागणी पंकज ठोंबरे यांनी केली.

अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास योजनांमध्ये लाभार्थी निवड पारदर्शक पद्धतीने व्हावी, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ मिळू नये आणि पूर्वी लाभ घेतलेल्यांना पुन्हा लाभ दिला जाऊ नये, अशा सूचना सभेत देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर डीबीटीद्वारे निधी जमा करण्यावरही भर देण्यात आला.

दलित वस्त्यांमधील अनेक सिमेंट काँक्रीट रस्ते काही महिन्यांतच खराब होत असल्याबद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. शाखा अभियंत्यांनी नियमित तपासणी करून दर्जेदार आणि टिकाऊ कामे करावीत, अशा स्पष्ट सूचना सभेत करण्यात आल्या.

फुलंब्री, खुलताबाद आणि पैठण येथे ३० खाटांची आयुष रुग्णालये सुरू करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. जिल्हा आयुष रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याचाही निर्णय झाला. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुष डॉक्टरांनी पर्यायी दिवशी ओपीडी सेवा सुरू करावी, अशी सूचना करण्यात आली.

## NHMच्या 15,010 कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा

पान 1 वरून ->

वेतन, महागाई भत्ता आणि प्रवास भत्ता मिळणार असून सध्याचे वेतनही संरक्षित राहणार आहे. मात्र, पदोन्नती, निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन, आश्वासित प्रगती योजना आणि अनुकंपा नियुक्तीचा लाभ मिळणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

अधिसंख्य पदे ही व्यक्तीसापेक्ष असतील. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, राजीनामा दिल्यानंतर किंवा अन्य कारणाने सेवा संपुष्टात आल्यानंतर ती पदे आपोआप रद्द होतील. भविष्यात अशा प्रकारची नियमितीकरणाची प्रकरणे टाळण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाची नियुक्ती प्रामुख्याने बाह्यस्त्रोत किंवा सेवा करार पद्धतीने करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरला असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याची भावना कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## वसंतराव नाईकांचे विचार आजही विकासाचे



**जिंतूर, दि. १ (प्रतिनिधी) :** महाराष्ट्राचे शिल्पकार व हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर दिवाणी न्यायालयात अभिवादन कार्यक्रम झाला. मा. न्यायाधीश तळणीकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्व. नाईक यांच्या कृषी, शिक्षण, ग्रामीण विकास, रोजगार हमी योजना व श्वेतक्रांतीतील योगदानाचा आढावा घेत, त्यांचे विचार आजही विकासाचा मार्ग दाखवणारे असल्याचे सांगितले. अँड. विजयराव देशमुख यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. गजानन नागरे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ, वकील संघाचे पदाधिकारी, न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकरी यांच्या मागे रानडुक्कर धावत सुटले

**फर्दापूर :** फर्दापूर येथील शेतकरी सकाळी शेतात काम करीत असताना अचानक रानडुक्कर यांचा हल्ला मंगळवारी सकाळी साडे दहा वाजता सलीम करीम लाला आणि आरिफ खान हे सकाळी शेतात मिरच्या प्लाट मध्ये काम करत असताना अचानक एक रानडुक्कर सैरावैरा धावत त्याच्या दिशेने धावत येत असताना त्यांना आवाज आला आणि या दोन्ही शेतकरी लिंबाच्या झाडावर पळत जाऊन चढले तरी हे रानडुक्कर झाडांच्या खालून जात नव्हते त्यामुळे यांनी बाजूला असलेल्या शेतकरी यांना फोन लावून बोलवून सांगितले आणि त्याला हुसकावून लावण्यात आले आज हे शेतकरी झाडावर चढून गेले नसते तर फर्दापूर परिसरात हि रानडुक्कराचा तिसरा हल्ला असता त्यामुळे वनविभागाने या रानडुक्कराचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत .

## पॅराआलिंपिक खेळाडूंना क्रीडा साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य

### 10 जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी:** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांच्या अखर्चित दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत सन २०२६-२७ करीता (फक्त ग्रामीण भागातील रहिवासी यांचेसाठी) पॅराआलिंपिक खेळाडूंना खेळाची सामुग्री घेण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. १० जुलै 2026 असून, सदर अर्ज सक्षम पोर्टलवर www.sakshamparbhani.in या लिंकवर दि. १० जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत.

योजनेसाठी अर्जदारांनी पुढील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. पॅराऑलिंपिक खेळात सहभाग असल्याचे पॅराआलिंपिक असोसिएशनचे प्रमाणपत्र, साहित्याचे नाव व किंमत बाबतचे कोटेशन, किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र, रुपये १ लाखाच्या मर्यादितील सन २०२५-२६ चे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी, परभणी यांचेकडून साहित्याची यादी प्रमाणित असणे आवश्यक आहे.

वरील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र पॅराआलिंपिक खेळाडूंनी दि. १० जुलै २०२६ पर्यंत सक्षम पोर्टलवर अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे (जिल्हा परिषद) सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## बिरबल राठोड यांचे निधन



हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१ जुलै :** तालुक्यातील जंगलाताडा येथील बिरबल लक्ष्मण राठोड (वय.८५) यांचे दि.३० मंगळवार रोजी रात्री ७.३० वा.अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर दि.१ बुधवार रोजी सकाळी १०.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते श्रावण राठोड यांचे ते वडील होत

CHANGE OF NAME हिंदूप्रकाशवार्ता

I, OLD NAME : SHAIKH ALMAS FATEMA MASOOD,
Residing : At Post Shivna.Tq.Sillod. Dist Chh.Sambhajinagar [431132],
have changed my name to
NEW NAME : ALMAS ADIL SHAIKH
and shall hereafter be known as
NAME : ALMAS ADIL SHAIKH
for all purposes.

CHANGE OF NAME हिंदूप्रकाशवार्ता

I, OLD NAME : SHIFA NAAZ SK RAFIQUE,
Residing : At Post Shivna.Tq.Sillod. Dist Chh.Sambhajinagar [431132],
have changed my name to
NEW NAME : SHIFA SARFRAZ SHAIKH
and shall hereafter be known as
NAME : SHIFA SARFRAZ SHAIKH
for all purposes.

CHANGE OF NAME हिंदूप्रकाशवार्ता

I, OLD NAME : SHAIKH SARFRAZ MOHD QAISER SHAIKH
Residing : At Post Shivna.Tq.Sillod. Dist Chh.Sambhajinagar [431132],
have changed my name to
NEW NAME : SHAIKH SARFRAZ SHAIKH KAISAR
and shall hereafter be known as
NAME : SHAIKH SARFRAZ SHAIKH KAISARb
for all purposes.

# नवोदित उद्योजकांसाठी मोठी संधी! ईव्ही चार्जिंग स्टेशन सुरु करण्यासाठी 'अमृत' करणार मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा (EV) वाढता वापर लक्षात घेता, नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभरात 'ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई (MSME) घटक आणि ग्रामीण भागातील इच्छुकांना स्वतःचा ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक ठरणार आहे. या क्षेत्रात ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन, उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, तांत्रिक सेवा आणि फ्रँचायझी मॉडेल अशा अनेक व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत. ग्रामीण भागामध्ये चार्जिंग हब उभारणी याद्वारे रोजगाराची नवीन साधने निर्माण होणार आहेत. अमृतच्या या विशेष उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण दिले जाईल. यामध्ये व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल (Project Report) तयार करणे, स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि बाजारपेठेचा अभ्यास याविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय, अमृतच्या 'वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा' लाभही पात्र लाभार्थ्यांना मिळणार असल्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठी आर्थिक मदत होणार आहे.या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट (SHG), एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट आणि ग्रामीण उद्योजक पात्र राहतील. व्याज परतावा योजनेसाठी अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी असलेल्या पात्रता व अटी लागू असतील. ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायासोबतच ऊर्जा व्यवस्थापन, तांत्रिक सेवा आणि ईव्ही उपकरण विक्री या क्षेत्रांमध्येही रोजगार व करिअरच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. स्वतःचा अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अमृत संस्थेच्या mahaamrut.org.in या अधिकृत संकेतस्थळावर जावे. तेथील 'योजना' विभागातील 'विशेष योजना' या मेनू अंतर्गत EV charging Station Partner मध्ये ऑनलाईन अर्ज करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

## वैजापूरात चक्री जुगारावर धाड; रोख रक्कम व साहित्य जप्त, गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता

**वैजापूर | प्रतिनिधी :** वैजापूर शहरातील बोथरा पेट्रोल पंपाजवळील एका टपरीत सुरू असलेल्या चक्री जुगार अड्ड्यावर वैजापूर पोलिसांनी छापा टाकून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवैध धंद्यांविरोधातील कारवाईदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने १ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६.१५ वाजता बोथरा पेट्रोल पंपाजवळील ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी शुभम रावसाहेब जाधव (वय ३०, रा. इंगळे गल्ली, वैजापूर) हा लोकांकडून पैसे घेऊन 'चक्री' नावाचा जुगार खेळविताना आढळून आला.

कारवाईदरम्यान आरोपीकडून रोख १,१२३ रुपये, एक एलईडी टीव्ही (अंदाजे किंमत २० हजार रुपये), एक स्मार्ट मोबाईल (अंदाजे किंमत १५ हजार रुपये) तसेच चक्की जुगाराचे साहित्य असा एकूण ३६,१२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोलिस अंमलदार अमोल कांबळे यांच्या फिर्यादीवरून वैजापूर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

## महावितरणच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

### स्व. सुनंदा मोरे यांच्या मृत्यूप्रकरणी सखोल चौकशीची मागणी; अन्यथा शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** पुंडलिकनगर परिसरात शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत स्व. सुनंदा राजेंद्र मोरे यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गंभीर निष्काळजीपणाची सखोल चौकशी करून दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी शिवसेनेच्या वतीने पोलीस आयुक्तांकडे करण्यात आली आहे. या प्रकरणात तातडीने कठोर कारवाई न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी कुणाल नितीन मराठे यांच्यासह सागर देवकर पाटील, सुहास बागल, विशाल निळ पाटील, सचिन निळ पगार, मिलिंद दाभाडे, उमेश पवार,शुभम साळवे, सचिन गायकवाड, ऋषिकेश शेटे आणि आबाज शेख यांची उपस्थिती होती.

निवेदनात म्हटले आहे की, पुंडलिकनगर परिसरातील धोकादायक विद्युत तारा, वीजपुरवठ्यातील त्रुटी आणि सुरक्षेच्या उपाययोजनांतील गंभीर कमतरतांबाबत स्थानिक नागरिकांनी यापूर्वी अनेकदा महावितरणकडे तक्रारी आणि निवेदने दिली होती. मात्र संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळेच ही जीवघेणी दुर्घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांच्या वारंवार तक्रारींनंतरही आवश्यक दुरुस्ती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळेच स्व. सुनंदा मोरे यांना जीव गमवावा लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवालही शिवसेनेने उपस्थित केला आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करून निष्काळजीपणा अथवा कर्तव्यातील कसूर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधासह लागू असलेल्या सर्व संबंधित कायदेशीर कलमान्वये तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शहरातील धोकादायक विद्युत यंत्रणा व तारा यांची तातडीने तपासणी करून आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश महावितरणला द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात दोषींना पाठीशी घालण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत, तातडीने ठोस कारवाई न झाल्यास शिवसेना नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारेल आणि त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## अंधारी केंद्रीय प्राथमिक शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

हिंदू प्रकाशवार्ता | अंधारी



अंधारी येथील केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये दि. ३० जून रोजी शालेय व्यवस्थापन समितीच्या निवड प्रक्रियेला उत्साहपूर्ण व खेळीमेळीचे वातावरण लाभले. पालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत समितीची निवड सर्वानुमते व बिनविरोध करण्यात आली. यामध्ये विलास गोरे यांची अध्यक्षपदी, तर दिनकर तायडे यांची उपाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचा सक्रिय सहभाग वाढावा, या उद्देशाने शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. नव्याने निवड झालेल्या समितीमध्ये पालक प्रतिनिधी म्हणून दिपक शिरसाठ, रऊफ कुरेशी, सुनील वानखेडे, जाकेर बेग, अनिस पटेल, छाया काटकर, रुपाली धोंगटे , मनिषा पांडव, अर्चना पवार, आणि मिना मोहिते यांची निवड करण्यात आली.

या निवड प्रक्रियेस विशेष उपस्थिती माजी केंद्रीय मुख्याध्यापक अशोक गोंडाळे व अजिनाथ काटकर यांची लाभली. त्यांनी शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका, पालकांची जबाबदारी आणि शाळेच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक संभाजी चव्हाण, केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका हेमलता वाघमारे तसेच शिक्षिका आरती जारवाल, आम्रपाली भस्मे, अनिता आलाट आणि वर्षा सागावे उपस्थित होत्या. उपस्थितांनी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे अभिनंदन करून शाळेच्या प्रगतीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## कृषि विकासासाठी वसंतराव नाईक यांचे आदर्श घ्यावे : कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती दिवस दिनांक १ जुलै रोजी कृषि दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ परिसरातील स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या स्मारकास माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या शुभहस्ते पुष्पपूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, स्वर्गीय वसंतराव नाईक हे देशाला आणि महाराष्ट्राला लाभलेले अनमोल रत्न होते. अत्यंत कठीण काळात त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली आणि सलग ११ वर्षे राज्याचा यशस्वी कारभार पाहिला. मुख्यमंत्री होण्यापूर्वी देशात लोकसंख्या कमी असतानाही अन्नधान्याची मोठी टंचाई होती. मात्र त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली हरितक्रांतीची सुरुवात झाली आणि ती यशस्वीपणे राबविण्यात आली.

त्यामुळे आज देशाची लोकसंख्या १४० कोटींपेक्षा अधिक असूनही भारत सुमारे ३७६ दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन करत आहे. एवढेच नव्हे तर देशातील सुमारे ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य पुरवठा करून भारत अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर झाला असून अनेक देशांना अन्नधान्याची निर्यातही करत आहे. गेल्या वर्षी भारताचे माननीय पंतप्रधान यांनीदेखील भारत संपूर्ण जगाला अन्नधान्य पुरवठा करू शकतो, असे नमूद केले होते. हे यश हरितक्रांतीमुळेच शक्य झाले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात जागतिक पातळीवर भारतामध्ये आर्थिक गुंतवणूक करणे फायदेशीर ठरणार नाही, अशी चर्चा होत होती. मात्र अशा कठीण परिस्थितीत स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी हे आव्हान समर्थपणे पेलत हरितक्रांतीच्या माध्यमातून देशाच्या शेती विकासाला नवी दिशा दिली.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य देशाच्या कृषि विकासामध्ये दिशादर्शक कार्य करत आहे. यावेळी त्यांनी माजी केंद्रीय कृषिमंत्री मा. श्री शरदचंद्र पवार यांच्या कृषि विकासातील योगदानाचाही विशेष उल्लेख केला. भारतीय शेती महाराष्ट्रातील कृषि क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात ज्ञान आत्मसात करत आहे. त्यामुळे आपण महाराष्ट्राचे नागरिक म्हणून या महान व्यक्तिमत्त्वांचा आदर्श घेऊन शेती विकासासाठी चांगले कार्य केले पाहिजे. याबरोबरच विद्यापीठही सातत्याने प्रगती करत असून या यशामध्ये सर्वांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. नीता गायकवाड, सहाय्यक नियंत्रक श्री. अनंत कदम तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना आणि रावे उपक्रमातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज पाथ्रीकर आणि डॉ. फरिया खान यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्यावतीने सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ व २०२५-२६ या चार वर्षांसाठी जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटू व क्रीडा मार्गदर्शक यांना जिल्हा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. एकूण ४४ क्रीडा प्रकारांमधून या पुरस्कारांची निवड करण्यात येणार आहे जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता गुणवंत क्रीडापटू (पुरुष, महिला व दिव्यांग खेळाडू) तसेच क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडून विहित नमुन्यात अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज दि. १६ जुलै २०२६ पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, स्टेशन रोड, परभणी येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी संजय मुंढे, राज्य क्रीडा मार्गदर्शक (मो. ९४२२१७८००९ / ८८३०४१४५००) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले आहे.

क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी अर्जदार हा महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्यास असावा. त्याने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत तसेच महाराष्ट्रामध्ये सलग १० वर्षे क्रीडा मार्गदर्शक म्हणून कार्य केलेले असावे.गुणवंत खेळाडू पुरस्कारासाठी (१ महिला, १ पुरुष व १ दिव्यांग खेळाडू) अर्ज करणाऱ्या खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतच्या मागील ५ वर्षांपैकी किमान २ वर्षे संबंधित जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त क्रीडा संघटना, शालेय क्रीडा स्पर्धा आणि केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धांमधील कामगिरीचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येणार आहे.

# एलोरा इंग्लिश स्कूलमध्ये उत्साहात वसंतराव नाईक जयंती साजरी

## विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भाषणे; कृषी दिनानिमित्त वसंतराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** कृषी दिनानिमित्त एलोरा इंग्लिश स्कूलमध्ये माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे शिल्पकार स्वर्गीय वसंतराव नाईक यांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या कृषी, ग्रामीण विकास आणि प्रगत महाराष्ट्राच्या उभारणीत दिलेल्या योगदानाला यावेळी अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी पुष्पांजली वाहून आदरांजली अर्पण केली.

यावेळी शिक्षिका अश्विनी काळे यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याचा आढावा घेत, शेती विकास, जलसिंचन, ग्रामीण भागाचा विकास आणि हरित क्रांतीतील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आढे शिवन्या, राठोड आराध्या, देशमुख प्रथमेश, चंदनशिव अक्षरा, भालेराव श्रुत्वांश आणि बोबडे कार्तिकी यांनी इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतून प्रेरणादायी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी हरित क्रांती, जलसिंचनातील सुधारणा आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नाईक यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.

यावेळी प्रथमेश देशमुख म्हणाला, "वसंतराव नाईक यांनी राज्याची खरी ताकद शेतकरी आणि शेतीत असल्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी शेतीचा सन्मान करून तिच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प करायला हवा." तर अक्षरा चंदनशिव हिने कष्ट, स्वावलंबन आणि समाजसेवेचा त्यांचा संदेश आजच्या युवकांसाठीही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

समारोपप्रसंगी मुख्याध्यापकांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करत वसंतराव नाईक यांच्या आदर्शांचा जीवनात अंगीकार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हरजीतकोर सौदी, नीलाक्षी राव, स्वाती देशमुख, अर्चना मांडे, सुवर्णा क्षीरसागर, वैशाली शिरवड, सुहास भानप, मनीषा फुलारे, स्नेहा जोहरे, वेदिका इंगळे, वैष्णवी काथार आणि पूजा शेळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निम्मित अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले. सिडको बसस्थानक परिसरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास ओबीसी व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे व महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये,नगरसेवक प्रमोद राठोड,बालाजी मुंढे,गणेश नावंदर,रामेश्वर भादवे,सुरेखा सानप,आयुक्त अमोल येडगे,उप आयुक्त नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे,मुख्य उद्यान अधिक्षक विजय पाटील,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर,संतोष कोठाळे आदींची उपस्थिती होती.

# नाती कलंकित! अल्पवयीन सालीवर अत्याचार करणाऱ्या नराधम भावजीला 20 वर्षे सक्तमजुरी

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील छावणी भागात नातेसंबंधांना काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली असून, १६ वर्षीय अल्पवयीन सालीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम भावजीला न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरी आणि ३० हजार रुपये दंडाची कठोर शिक्षा सुनावली आहे. छत्रपती संभाजीनगरचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, दंडाची सर्व रक्कम पीडित मुलीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेशही दिले आहेत.

या घटनेतील पीडित मुलगी ही मूळची बुलडाणा जिल्ह्यातील रहिवासी आहे. काही महिन्यांपूर्वी ती छत्रपती संभाजीनगर शहरातील छावणी भागात राहणाऱ्या आपल्या मोठ्या बहिणीकडे राहण्यासाठी आली होती. बहीण आणि भावजीसोबत राहत असताना, एके रात्री तिच्या भावजीने तिच्या असहायतेचा फायदा उठवून तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध निर्माण केले. या अनपेक्षित आणि भयानक प्रकारामुळे ती अल्पवयीन मुलगी प्रचंड घाबरली. समाजात बदनामी होईल आणि कौटुंबिक वाद निर्माण होतील या भीतीने तिने हा प्रकार आपल्या आईला, बहिणीला किंवा इतर कोणालाही सांगितला नाही आणि काही दिवसांनी ती आपल्या गावी परतली. गावी परतल्यानंतर काही महिन्यांनी निसर्ग नियमानुसार त्या मुलीचे पोट वाढू लागल्याचे तिच्या आईच्या निदर्शनास आले. आईने तात्काळ तिला वैद्यकीय तपासणीसाठी नेले असता, डॉक्टरांनी ती मुलगी गर्भवती असल्याचे सांगितले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर कुटुंबाला प्रचंड धक्का बसला. प्रसव वेदना सुरू झाल्यानंतर तिला पुन्हा छत्रपती संभाजीनगरात आणण्यात आले आणि खडकेश्वर येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, तिथे तिची प्रसुती झाली.

पीडित मुलगी अल्पवयीन असल्यामुळे कायद्यानुसार डॉक्टरांनी या प्रकरणाची माहिती छावणी पोलिसांना दिली. पोलिसांनी रुग्णालयात जाऊन मुलीची चौकशी केली असता, तिने आपल्यासोबत घडलेला सर्व प्रसंग सांगून भावजीनेच अत्याचार केल्याचे स्पष्ट केले. यानंतर छावणी पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपी भावजीला अटक केली. हा खटला न्यायालयात सुनावणीसाठी आला असता, सहाय्यक सरकारी लोकअभियोक्ता डी. आर. काठुळे यांनी सरकार पक्षातर्फे ७ महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवले.

वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांचे पुरावे यावरून आरोपीवरील गुन्हा सिद्ध झाला. सुनावणीअंती न्यायालयाने या नराधम भावजीला दोषी ठरवून २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

## बालविवाह रोखण्यासाठी आता लग्नपत्रिकेवर वधु-वराची जन्मतारीख छापावी लागणार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**परभणी:** शुभमंगल सावधान...! हा लग्नातला पारंपरिक इशारा आता कायद्याने दिला जाणार आहे. राज्यात बालविवाहाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने महत्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यानुसार आता लग्नपत्रिकेवर वधु आणि वर दोघांचीही संपूर्ण जन्मतारीख छापणे बंधनकारक होणार आहे. राजस्थानच्या धर्तीवर महाराष्ट्रातही या नियमाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतला आहे. राज्यात आजही अनेक ग्रामीण भागात बालविवाह सर्रास होतात. अक्षयतृतीया, देवदिवाळीच्या मुहूर्तावर ही संख्या वाढते. अनेकदा शाळकरी मुलींना शिक्षण अर्धवट सोडून बोहल्यावर चढ़ावे लागते. अशा प्रकरणांवर आळा घालण्यासाठीच लग्नपत्रिकेतुन वयाचा दाखला देण्याचा हा अभिनव उपक्रम आहे. असा असणार नवीन नियम - नवीन नियमानुसार छपाईसाठी येणाऱ्या प्रत्येक लग्नपत्रिकेवर वधू-वराची जन्मतारीख, जन्मस्थळ आणि आधार क्रमांकासह वयाचा पुरावा नमूद करणे बंधनकारक असेल. ही माहिती खोटी आढळल्यास संबंधितांवर थेट गुन्हा दाखल होणार आहे. प्रेस आणि मंगल कार्यालयांवर नजर- या मोहिमेत प्रिंटिंग प्रेस आणि मंगल कार्यालयांकडे महत्वाची जबाबदारी असणार आहे. लग्नपत्रिका छापताना वधूचे वय १८ आणि वराचे २१ वर्षपेक्षा कमी असेल तर प्रेस मालकाने छपाई नाकारावी, असे आदेश राहतील. तसेच मंगल कार्यालय बुक करताना दोघांचे वयाचे पुरावे तपासण्याची जबाबदारी व्यवस्थापनावर असेल. नियमांचे उल्लंघन केल्यास प्रेसचा परवाना रद्द होण्यासह मालकावरही बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई होईल. विशेष शिक्षकांची केली जाणार नेमणूक - बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण थांबते. विदयार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा परिषद स्वतंत्र विशेष शिक्षकांची नियुक्ती करणार आहे. लग्न पत्रिकेवर जन्मतारीख बंधनकारक केल्याने वय लपवणे शक्य होणार नाही. काय आहे शिक्षा -बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार बालविवाह केल्यास किंवा प्रोत्साहन दिल्यास दोन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. आता लग्न लावणारे भटजी, पुरोहित, फोटोग्राफर, केटरर्स आणि लग्नपत्रिका छापणारे प्रेस मालक यांनाही सहआरोपी केले जाणार आहे. त्यामुळे आम्हाला माहिती नव्हते ही पळवाट बंद होणार आहे. जिल्हाभरात बालविवाह होणार नाही याबाबत संबंधित सर्वांनी दक्ष राहून परभणी जिल्हा बालविवाह मुक्त जिल्हा करण्याकरीता प्रयत्न करणे आवश्यक आहे. गावात, शहरात बालविवाह ठरला असेल तर त्याबाबत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल कमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी केले आहे.

# सिल्लोड येथे भारतीय जनता पक्षाच्या नव्या कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा

## केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन, सुहास सिरसाट व इद्रिस मुलतानी यांचा नागरी सत्कार

**सिल्लोड, दि. १ जुलै :** भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला आणि कार्यकर्त्यांच्या बळकटीला नवे अधिष्ठान देणाऱ्या सिल्लोड येथील नव्या भाजपा कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी तसेच सिल्लोड शहरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षणाचा ठरणार आहे.

या नव्या कार्यालयाचे उद्घाटन भारत सरकारचे केंद्रीय राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विधानपरिषदेवर नवनिर्वाचित सदस्य मा. सुहास सिरसाट यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या पसमांदा मुस्लिम समाज राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती होऊन राज्यमंत्री दर्जा प्राप्त झाल्याबद्दल मा. इद्रिस मुलतानी यांचाही विशेष नागरी सत्कार करण्यात येणार आहे. दोन्ही मान्यवरांचा सन्मान हा सिल्लोड तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण मानला जात असून, या निमित्ताने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.



भाजपा कार्यालय हे केवळ पक्षाचे कार्यालय नसून कार्यकर्त्यांचे संवाद केंद्र, जनसामान्यांच्या समस्या सोडविण्याचे माध्यम आणि संघटनात्मक उपक्रमांचे प्रमुख केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांशी अधिक प्रभावी संवाद साधला जाईल तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर व नागरिकांसाठी दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.

**स्थळ :** नवीन भाजपा कार्यालय, पाणी फिल्टरजवळ, जळगाव रोड, सिल्लोड.

भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक तसेच सिल्लोड शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन भाजपा मंडळाध्यक्ष मनोज मोरेल्लू, एकनाथ हिवाळे, आत्माराम पाडळे, नारायण खोमणे, संजय पाटील , यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मॉंटेसोरी बालक मंदिरसह आ. कृ. प्रशालेत 'कृषी संस्कृती'चा जागर

**छत्रपती संभाजीनगर :** काळ्या आईशी नाते सांगणाऱ्या कृषी संस्कृतीचा गौरव करण्यासाठी आणि हरितक्रांतीचे जनक कै. वसंतराव नाईक यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी, मॉंटेसोरी बालक मंदिर शिक्षण संस्था संचलित मॉंटेसोरी बालक मंदिर प्राथमिक विभाग व आनंद कृष्ण वाघमारे प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मान्यवरांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन केले. पूजनाचा मान शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका उल्का पाठक यांना मिळाला. याप्रसंगी वाघमारे प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रेय हाके, प्राथमिकचे प्रभारी दादासाहेब खेळवणे, ज्येष्ठ शिक्षक राऊत,



सोनवणे यांनी शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे आणि त्याच्या घामातूनच देशाची समृद्धी फुलते, असा संदेश दिला. संगीता भवर यांनी वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन वैशाली कुलकर्णी यांनी केले. सोनल पहाडे यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वसंतराव नाईक जयंतीनिमित्त ७०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हरित क्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजीनगर ते रामनगर या मार्गालगत ७०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासह परिसराचे सुशोभीकरण हा उद्देश ठेवून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते झाला.



यावेळी नगरसेवक प्रमोद राठोड, बालाजी मुंडे, मनपा आयुक्त अमोल येडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मोहिमेत भारतीय वंशाच्या सुमारे ७०० वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षांचे दीर्घकालीन संवर्धन व्हावे आणि परिसर स्वच्छ व हिरवागार राहावा, यासाठी संबंधित रस्त्यालगत फेन्सिंग उभारण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यामुळे कचरा टाकणे आणि अतिक्रमणाला आळा बसून वृक्षांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

# शिवना सर्कलच्या लोकहिताच्या प्रश्नांची सभागृहात आग्रही मांडणी!

## जि. प. सदस्य कु. निकितताई राजुबाबा काळे यांचा पहिल्याच सभेत धडाका

अजींठा प्रतिनिधी सय्यद जमीरोद्दीन

जिल्हा परिषदेची पहिली सर्वसाधारण सभा अत्यंत वादळी आणि यशस्वीरीत्या संपन्न झाली. या पहिल्याच सभेत शिवना जिल्हा परिषद सर्कलचे नेतृत्व करणाऱ्या लोकप्रिय आणि डॅशिंग सदस्या कु. निकिताताई राजुबाबा काळे यांनी आपल्या मतदारसंघातील विविध महत्त्वाच्या आणि प्रलंबित लोकहिताच्या विषयांवर सभागृहाचे लक्ष वेधत प्रशासनाला धारेवर धरले.



शिवना सर्कलच्या विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण, रोखठोक व ठामपणे आपली बाजू मांडली. ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, आरोग्य आणि शिक्षण यांसारखे तळागाळातील लोकांचे प्रश्न सभागृहात मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण

> **"मतदारसंघाचा विकास आणि नागरिकांच्या समस्या सोडवणे हेच माझे मुख्य ध्येय आहे. प्रशासनाकडून कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही."**
>
> **— कु. निकिताताई राजुबाबा काळे**

सदैव कटिबद्ध आहोत, हाच विश्वास त्यांनी या सभेच्या माध्यमातून पुन्हा एकदा दाखवून दिला आहे.

या पहिल्याच सभेत निकिताताईंनी दाखवलेल्या आक्रमक आणि अभ्यासू बाण्यामुळे शिवना परिसरातील नागरिकांमधून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे वरिष्ठ पदाधिकारी, विविध विभागांचे मुख्य अधिकारी आणि सन्माननीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 25 डॉक्टरांचा जिल्हा परिषदेकडून गौरव

## जागतिक डॉक्टर दिनानिमित्त प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेचा भक्कम कणा ठरलेल्या डॉक्टरांच्या सेवाभावाचा जागतिक डॉक्टर दिनानिमित्त जिल्हा परिषद आरोग्य विभागाने सन्मानपूर्वक गौरव केला. जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात झालेल्या कार्यक्रमात तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांसह उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण २५ डॉक्टरांना प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील व आरोग्य व शिक्षण सभापती सौ. अनिता ज्ञानेश्वर मोठे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मिनू पी. एम. यांच्या हस्ते डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवर्गावकर, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शैलजा यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मौजे उंडणगाव येथे कृषी दिन उत्साहात साजरा

सिल्लोड प्रतिनिधी

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर पी एम मिन्नू व गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माननीय सभापती सौ अनिता ताई सुरेश बनकर यांच्या अध्यक्षतेखाली

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी मौजे उंडणगाव येथे कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रगतशील शेतकरी डॉ. भवर यांनी किमान स्वतःच्या कुटुंबासाठी तरी सेंद्रिय शेती करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच कोल्हापूर येथील कान्हेरी मठ येथे सुरू असलेल्या सेंद्रिय शेतीच्या यशस्वी प्रयोगाविषयी माहिती दिली.

डॉ. विजय चव्हाण यांनी जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना विविध चारा पिकांची लागवड, त्यांचे नियोजन व पशुपालनातील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली.

तालुका कृषी अधिकारी डॉ. संदीप जगताप यांनी शेतीबरोबरच कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच गाय-म्हैस पालन यांसारखे पूरक व्यवसाय शेतकऱ्यांनी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे शेतीवरील जोखीम कमी होऊन वर्षभर उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध राहतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच शेतीचा व्यवसाय उद्योगाप्रमाणे चालवून प्रत्येक खर्च व उत्पन्नाची नियमित नोंद ठेवावी, असेही त्यांनी आवाहन केले.

जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन वाघ यांनी कृषी विभागामार्फत अशा प्रकारचे शेतकरी हिताचे कार्यक्रम गावपातळीवर वारंवार आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सहकार्यक्रम अधिकारी अरुण घोलप यांनी विकसित भारत अभियान व विविध शासकीय योजनांमधील नव्या बदलांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी पंचायत समितीच्या उपकरातून माती परीक्षण प्रयोगशाळा (लॅब) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. तसेच कान्हेरी मठासारख्या ठिकाणी शेतकरी अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात येईल, असे सांगितले. सध्याच्या हवामानाचा विचार करून शेतकऱ्यांनी कमी कालावधीत येणाऱ्या पिकांची निवड करावी तसेच फळबाग लागवड व विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक गटविकास अधिकारी आशिष मस्के यांनी केले. त्यांनी स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील योगदानाचा आढावा घेत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी (कृषी) विश्वास बनसोडे यांनी केले, तर आभार कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी यांनी मानले.



या कार्यक्रमास पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन वाघ, पंचायत समिती सदस्या सौ. वृषाली मिरकर, ग्रामपंचायत प्रशासक लक्ष्मण धनवई, सुरेश बनकर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, सहाय्यक गटविकास अधिकारी आशिष मस्के, तालुका कृषी अधिकारी डॉ. संदीप जगताप, प्रगतशील शेतकरी डॉ. भवर, माजी उपसरपंच सौ. सुनीता सुभाष लांडगे, ग्रामपंचायत सदस्य दिलीप किसन धनवई, दत्तात्रय तुकाराम बोराडे, मंडळ कृषी अधिकारी भगवान सुरडकर, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विनोद मोरे, कुडके, जी. बी. इंगळे तसेच तालुका कृषी कार्यालयातील उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विस्तार अधिकारी (कृषी) जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे तसेच ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर बोराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास गावातील बहुसंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911